# प्रेसनोट

दि. ०६/०३/२०२४

## भुमी अभिलेख कार्यालय, ता. शिरुर, जि. पुणे येथील येथील भुकरमापक व खाजगी इसमावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिक्रापुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४३ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) शिवराज यशवंत बंडगर, वय २४ वर्ष, पद - भुकरमापक, भुमी अभिलेख कार्यालय, ता. शिरुर, जि. पुणे. (वर्ग-३)<br>२) अमोल विष्णु कदम, वय २७ वर्ष, रा. सरदवाडी, ता. शिरुर, जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- रुपये (तीन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०६/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | ०६/०३/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ०६/०३/२०२४ रोजी धामारी गाव, ता. शिरुर, जि. पुणे येथील स्टॅन्ड समोर सार्वजनिक रोडवर.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार याची शेतजमीनीची हद्द कायम करण्याकरीता त्यांनी भुमी अभिलेख कार्यालय, शिरुर येथे रितसर अर्ज करुन, त्यासाठी लागणारी शासकीय फी भरलेली होती. लोकसेवक क्र. १ शिवराज बंडगर हे धामारी येथे आलेवर त्यांचे सोबत असणारे क्र. २ खाजगी इसम अमोल कदम यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या दोन गटाची शेतजमीन मोजणी करण्याकरीता व हद्द निश्चित करण्यासाठी ५,०००/- रुपयाची लाच मागणी केलेबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, खाजगी इसम क्र. २ अमोल कदम याने तक्रारदार यांचेकडे त्यांच्या शेतजमीन मोजणी करण्याकरीता व हद्द निश्चित करण्यासाठी तडजोडीअंती ३,०००/- रुपयाची (तीन हजार रुपये) लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करुन, खाजगी इसम अमोल कदम यांनी ३,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली व लोकसेवक क्र. १ शिवराज बंडगर यांनी आरोपी खाजगी इसम क्र. २ अमोल कदम याच्या लाच मागणीस व लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून शिक्रापुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.